Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# छत्रपती शाहू महाराज व सत्यशोधक समाज

**प्रा. डॉ. विद्यासागर पुंडलिक सोनकांबळे**
मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन जि. जालना
मो. 9423460570

महात्मा फुलेनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज भारतीय इतिहासातील ऐतिहासिक घटनाच म्हणावी लागेल. ज्या ब्राम्हणी धर्माने समाजामध्ये विषमतेचे बीजारोपण करून समाज व्यवस्थेला विषम अवस्थेत नेऊन ठेवले होते देव-धर्म, उच्च-निच्च,श्रेष्ठ-कनिष्ठ हा भेदभाव संपुष्टात आणून ज्योतिबांनी सर्व मानव समान आहेत या ध्येयासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती

वर्णाश्रम धर्माने मानवामध्ये भेद निर्माण करुन जातीची उतरंड निर्माण केली काहीना श्रेष्ठ तर काहिना कनिष्ठ, शुद्र-अस्पृश्य ठरविले अशा विचारधारा विरोधात मानवी समानतेचा विचार करणारी चळवळ म्हणून मी. फुले नी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

ब्राह्मणेतर समाजात धार्मिक व सामाजिक बाबतीत नैराश्य आलेले होते ज्या ब्राम्हणी व्यवस्थेने बहुजनांना देव-धर्माची भिती दाखवून व आम्हीच देवाचे मध्यस्थ या विखारी विचाराने समाजामध्ये ब्राह्मण श्रेष्ठ ही कुविचारी प्रथा अस्तित्वात आलेली होती. यामुळे बहुजन समाज गतिविधी व ग्रंथप्रामाण्यवादी झालेला होता अशा बहुजन समाजाला चेतवण्यासाठीच सत्यशोधक समाजाची स्थापना २४/२७सप्टेबंर १८९३ रोजी पुणे येथे केली.

समाजातील जातीयता, अस्पृश्यता, ऊच्चनिच्चता परंपरेने चालत आलेले कर्मकांड, ब्राम्हणी पुरोहितशाही यापासून बहुजनांना मुक्त करण्यासाठी म. फुलेनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. या चळवळीच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार ब्राह्मण विरहीत स्वतंत्र धार्मिक कार्य पार पाण्याविषयी नियमावली तयार करण्यात आली यामुळे बहुजनांमध्ये परिवर्तन होऊ लागले आणि ब्राह्मण विचार कल्पना मागे पडु लागली. परिणामी सत्यशोधक चळवळ ब्राह्मण विरोधी आहे म्हणून ब्राह्मणी वृत्तपत्रातून विरोध सुरू झाला

या विषयी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात " ब्राह्मणेतर वादासंबधी खरा झगडा पुर्ण परंपरे विरूध्द नविन ज्ञानाच्या अविष्काराने निर्माण झालेल्या विचारसरणीने उठविलेले बंड. हा होता. ब्राह्मणेतर वाद ही एक विचारसरणी आहे. उच्च विचारांच्या, जातिभेदाच्या, स्थिती स्थानकाच्या हा सत्यशोधकाचा लढा होता. ब्राह्मण समाजाविरुद्ध हा लढा नव्हता. ब्राह्मणाच्या विशिष्ट ध्येयाविरुध् हा लढा होता राजसत्तेच्या.

जोरावर पेशव्यांनी ब्राह्मणासाठी खास सवलती आणि न्यायाच्या क्षेत्रातही खास शिक्षा पध्दती यांचा अवलंब केला आणि समाज. संरक्षण आणि समान न्याय या राज्यकारभारातील उच्च तत्वाना हरताळ पावला याच वेळी समाजात न्याय या राज्यकारभारातील उच्च तत्वाना हरताळ फासला याच वेळी समाजात दोन विभाग. पडले ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर ब्राह्मणाना न्याय वेगळा. त्याचे विशेष अधिकारही वेगळे आणि ब्राह्मणेतरासाठी. न्याय वेगळा ब्राह्मण आणि ब्राम्हणेतर अशा समाज विभागणीचे बीजारोपण पेशव्यांनी केले उच्चवर्गीयांची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी, मानवी हक्कासाठी फुलें चा विचार घेऊन सत्यशोधक चळवळ सुरू झाली परिवर्तनाच्या दिशेने बहुजनांचे पाऊल पडले"[१] सत्यशोधक चळवळ म. फुले जिवंत असेपर्यंत वेगाने प्रवास पावली मात्र फुलेंच्या मृत्यू नंतर थंडावली अशा वेळी छ. शाहूमहाराजांनी चळवळीला अप्रत्यक्षरीत्या सर्व प्रकारची भरीव मदत देऊन चळवळ वाढवली.

छ. शाहु महाराज सुरूवातीला आर्य समाजाकडे झुकले असल्याचे दिसते आर्य समाजाचे धार्मिक सुधारणेचे कार्य त्यांना पटले होते आर्य समाज ब्राह्मणी व्यवस्थेची मक्तेदारी मोडून वेदांचा अधिकार सर्वांना देत होता या विषयी छ. शाहू महाराज म्हणतात "आर्य समाज आपणास वेद निष्ठा शिकवितो पुराण निष्ठा नव्हे कारण पुराणे ही वेद निर्मिती नंतरच्या कालखंडातील निर्माण केलेल्या कल्पित कथा आहेत आर्य समाजातील तत्त्व मणुष्याची समानता शिकवितात आणि ब्राह्मणाची मक्तेदारी झुगारून देण्यास सांगतात"[२] आर्य समाजाचे तत्व पटलेले असल्यामुळे छ. शाहु महाराज आर्य समाजाकडे झुकले होते परंतु वेदोक्त प्रकरणामुळे ते दुर गेलेले दिसतात.

शाहु महाराज धार्मिक वृत्तीचे होते धार्मिक रितीरिवाज पार पाडत १९०० सालात पचंगगेवर महाराज स्नान करण्यास गेले असता राजघराण्याचे पुरोहित नारायणराव राज्योपाध्य हे वेदोक्त नत्राचा उच्चार न करता पुराणोक्त मंत्र म्हणत असल्याचे सोबत असलेल्या भागवत शास्त्रीनी महाराजांना सांगितले तेव्हा महाराज म्हणाले, अहो राज्योपाध्य तुम्ही वेदोक्त मंत्राएवजी पुराणोक्त मंत्र का म्हणत आहात. राज्योपाध्य-वेदोक्त मंत्राची शुद्रांना गरज नसते म्हणून पुराणोक्त म्हणतोय . महाराज- आपण स्नान न करता मंत्र म्हणत आहात. राज्योपाध्य-होय कारण शुद्रासाठी मंत्रोच्चार करताना पुरोहितांनी अगोदर स्नान करण्याची गरज नसते"[३] घटना शाहु महाराजाच्या जिव्हारी लागली आणि त्यातच सत्यशोधक चळवळीने स्वतंत्र धार्मिक विचाराने जन्माला घालून स्वतंत्र विधिनीयम तयार केले हे महाराजाना आवडले व आर्य समाजाकडे असलेली जवळीकता नंतर आर्य समाजाच्या होमहवन कर्मकांडामुळे ते या समाजाकडू दुर जात असल्याचे दिसतात.

वेदोक्त प्रकरण व सामाजिक समतेचे विचार शाहु महाराजाना जवळ वाटले "त्यांच्या मार्गदर्शनानुसार कोल्हापूर येथे परसराम घोसरवाडकर यांच्या अध्यक्षतेखाली ११ जानेवारी १९१९ ला भरलेल्या सभेत श्री शाहु सत्यशोधक समाज स्थापण्यात आला या सत्यशोधक समाजाच्या अधक्षपदी

भास्करराव जाधव यांची निवड झाली आणि अण्णासाहेब लठ्ठे उपाध्यक्ष, डोंगरे हे मुख्य अधिकारी व हरिभाऊ चव्हाण कार्यवाह होते धनगर समाजाचे विठ्ठल हिराजी डोळे हे शिक्षक असुन राजवाड्यावर नोकरीत होते शाहु महाराजानी सत्यशोधक समाजाचे काम करण्यासाठी डोळे यांची नियुक्ती केली होती त्यांचे मासिक वेतन मात्र त्यांना दरबाराकडुनच मिळत असे शाहु महाराजानी त्या समाजाला ईमारत बांधण्यासाठी जमीन ही देणगी म्हणून दिली"४ शाहु महाराजाचा पाठिंबा मिळाल्यानंतर भास्कर जाधव व वरील मंडळींना नवसंजीवनी मिळाली संघटनात्मक बांधणीस वेग आला. सत्यशोधक समाजाच्या. प्रचारासाठी भास्करराव जाधव यांनी 'मराठा दिनबंधु 'पत्रक काढले या पत्रकातुन सामान्यजनापर्यतं सत्यशोधक समाजाची ध्येय धोरण समजुन सांगितले जात.

या चळवळीत शाहु महाराजानी समोर न येता सर्व प्रकारची मदत केली होती, ते म्हणत सत्यशोधक चळवळीचा व माझा काही संबंध नाही परंतु परिस्थिती, घटना, प्रसंग याचा. विचार करून महाराजानी असे उदगार काढले असावेत. सत्यशोधक चळवळीच्या प्रसार व प्रचारामुळे ब्राह्मण-ब्राम्हणेत्तर वाद सुरू झालाकाही ठिकाणी दंगली सुध्दा फडके लागल्या. पुण्यातील केसरी वृत्तपत्रातुन विरोधी लिखाण होऊ लागले हा येणारा दबाव लक्षात घेऊनच शाहु महाराजानी सत्यशोधक चळवळीशी संबध नसल्याचे सांगितले मात्र पडद्यामागून त्यांनी ही चळवळ. वाढवण्यासाठी भरीव मदत केली होती

याविषयी सत्यशोधकाच्या जाहीर सभेत भास्करराव जाधव म्हणतात "कोल्हापूर समाजाचे काम कशा प्रकारे चालले आहे हे आपणास माहितच आहे त्याचे सर्व श्रेय श्रीमन्ममहाराज शाहु छत्रपतीस दिले गेले पाहिजे कारण त्यानी उध्दार बुध्दी ने आम्हास मदत देऊन धर्मविधी शिक्षणाचा मार्ग सुरू केला आहे"[५] या विधानावरून छ. शाहु महाराजानी चळवळीस भरपूर योगदान दिले होते हे सिद्ध होते. सत्यशोधक समाजाच्या वाढत्या प्रभावामुळे ब्राह्मणशाहीचे धाबे दणाणले सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून जे विवाह घडुन आले असे "ब्राह्मण गुरुच्या मदती शिवाय झालेले विवाह कायदेशीर नसुन अशा विवाहा पासून झालेली संतती बेकायदेशीर ठरणार आहे अशी कोंडी त्यांनी लागलीच तिखटमीठ लाऊन पिकविला आणि ब्राह्मणाच्या मदतीशिवाय झालेला विवाह अर्थातच रद्द ठरणार अशा अडवानी लोकांना भिडवून सत्यशोधक चळवळीची हवाच काढून घेण्याचा धूर्त डाव ब्राह्मणशाहीच्या संरक्षकानी टाकला पण तो शाहु छत्रपतीनी निष्प्रभ ठरविला" ६ ब्राह्मणशाहीने सत्यशोधक चळवळ थोपविण्यासाठी अनेक. युक्त्या. लढविल्या. मात्र यश येत नाही हे लक्षात आल्यावर डांबर घटना घडुन आणल "कोल्हापूरात किंग एडवर्ड व महाराणी अलेक्झांड्रा यांच्या पुतळ्याला १४-०२-१९१४ मध्ये कोणी अज्ञानाने डांबर फासले या घटनेमुळे सर्व मुंबई इलाख्यात खळबळ माजली या घटनेचे खापर सत्यशोधक समाजाचे नेते भास्करराव जाधव आणि अण्णासाहेब लठ्ठे या यांच्यावर फोडले तर. अण्णासाहेब लठ्ठयाना. मुख्य आरोपी केले गेले"७ या घटनेमुळे काही काळ वरील नेत्यांना सत्यशोधक चळवळीपासून दुर जावे लागले अशा प्रसंगी शाहु महाराजही या.

नेत्यांना पाठीशी घालु शकत नव्हती शेवटी हे प्रकरण कोणत्याही प्रकारचा छडा न लागता संपुष्टात आले आणि भास्करराव जाधव-लठ्ये मंडळी पुन्हा जोमाने चळवळीच्या कामाला जोमाने लागली.

**सारांश:**

म. फुलेंच्या निधनानंतर ही चळवळ संपुष्टात येते की काय अशी शंका निर्माण झाली होती तेव्हा छ. शाहु महाराजानी राजकीय बंधनांमुळे वा ब्राह्मणशाहिच्या या चळवळीला असलेल्या विरोधामुळे कोल्हापूरला राहुन कोल्हापूर व कोल्हापूर बाहेरच्या ठिकाणी चळवळ वाढवली कोल्हापूर संस्थानाबाहेरही या चळवळीच्या शाखा निर्माण करण्यासाठी छ. शाहु महाराजानी मदत केली. हेच कार्यकर्ते प्रत्यक्ष या चळवळीच्या अधिवेशनात शाहु महाराजानी. दिलेल्या मदतीबद्दल बोलु लागली महाराजा विषयी गौरवोद्गार. काढु लागली या. वरून महाराजांनी या चळवळी ला नवसंजीवनी मिळुन दिली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सत्यशोधक चळवळीला भरीव मदत करून प्रसार व प्रचार करण्यात शाहु महाराजांनी फार मोठे योगदान दिले त्यांच्या या मदतीमुळे महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक कार्यात क्रांतिकारी बदल घडून आले जो बहुजन समाज गतिशील झाला होता त्याना स्वत्वाची जाणीव होऊ लागली तो डोळसपणे अभ्यास. करून निर्णय घेऊ लागला असे महान कार्य शाहु महाराजानी करून सत्यशोधक समाजाला नवसंजीवनी प्राप्त करून दिली.

## संदर्भ

१) डॉ. फडके यांनी. दी. -म.फुले गौरव ग्रंथ (खंड १) १९९३, म.फूले चरित्र साधन समिती मुंबई पृ. ९७
२) नरके हरि(संपा.) म. फुले शोधाच्या नव्या वाटा (प.आ.१९९८) म. ज्योतीबा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती मुंबई पृ. ३०१
३) कांबळे उत्तम-राजर्षि शाहु महाराज आणि वेदोक्त प्रकरण (प.आ.२००४) सुगावा प्रकाशन पुणेपृ. १०
४) कीर धनंजय-राजर्षि शाहु छत्रपती (ति.आ.२००८) पॉप्युलर प्रकाशन मुंबई पृ. २१९
५) डॉ. पवार जयसिंगराव-राजर्षि शाहु छत्रपती एक मागोवा (प.आ.२००४) सुमारे प्रकाशन डोंबिवली (पु) पृ. ४१
६) प्रा. चगोंले. पी. एस. -सत्यशोधक समाजाचे आधारस्तंभ राजर्षी शाहू छत्रपती (प.आ.१९९६) गुरू रविदास प्रकाशन नागपूर पृ. ११
७) डॉ. पवार जयसिंगराव-राजर्षि शाहु छत्रपती जिवन व कार्य(प.आ.२०१२) महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर पृ. ११२